# 1. Zilla Parishad, Jalgaon – Citizen Interaction Initiative on 14/05/2025

A Golden Opportunity for Citizens to Interact Directly via Video Conference!

In an effort to improve the quality of life for its citizens, the Zilla Parishad, Jalgaon has launched an innovative initiative. Under the guidance of the Chief Executive Officer, Smt. MinalKarnawal, citizens can now interact directly with senior officials of the Zilla Parishad through daily video conferences.

The objective of this initiative is to provide a platform for citizens and villagers to directly communicate their issues, complaints, or suggestions to the administration. As a result, there will no longer be a need to visit the Zilla Parishad office in person—citizens can now connect with officials from the comfort of their homes.



पुण्य नगरी

## जिल्हा परिषदेचा 'नागरिकांशी संवाद' उपक्रम

### घरबसल्या वरिष्ठ अधिकाऱ्यांशी थेट संवादाची

जळगाव : जिल्ह्यातील नागरिकांचे जीवनमान अधिक सुलभ आणि पारदर्शक प्रशासनाच्या दिशेने एक पाऊल पुढे टाकत जिल्हा परिषद जळगावने ह्यनागरिकांशी संवादह्न या अभिनव उपक्रमाची सुरुवात केली आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती मीनल करनवाल यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आलेल्या या उपक्रमाचे उद्घाटन बुधवारी ऑनलाईन पद्धतीने करण्यात आले.

या उपक्रमाअंतर्गत आता नागरिकांना दररोज झूम ॲपद्वारे व्हिडिओ कॉन्फरन्स द्वारे जिल्हा परिषदेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांशी थेट संवाद साधण्याची सुविधा मिळणार आहे. उद्घाटनप्रसंगी मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती करनवाल यांनी स्वतः काही तक्रारदारांशी संवाद साधत त्यांच्या समस्या जाणून घेतल्या आणि त्या सोडवण्यासाठी तातडीने सूचना दिल्या.

या नव्या प्रणालीमुळे नागरिक, ग्रामस्थ व तक्रारदारांना जिल्हा परिषद कार्यालयात प्रत्यक्ष येण्याची गरज भासत नाही. झूम ॲपच्या माध्यमातून एक क्यू. आर. कोड व लिंक उपलब्ध करून दिली आहे. या माध्यमातून कोणतीही व्यक्ती घरबसल्या आपल्या अडचणी, सूचना किंवा तक्रारी थेट प्रशासनापर्यंत पोहोचवू शकते. ही सुविधा सोमवार ते शुक्रवार सकाळी १०.३० ते ११.३० या वेळेत उपलब्ध असेल.

या उपक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी रणधीर सोमवंशी, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रक आर. एस. लोखंडे, उपमुख्य अधिकारी स्नेहा पवार, भाऊसाहेब जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. स आदी उपस्थित होते. ह्यनागरिकांशी उपक्रमास पहिल्याच दिवशी उत्स् लाभला असून, भविष्यात प्रशासन यांच्यातील दरी कमी करण्यास उपयुक्त ठरणार आहे.

Jalgaon Edition
May 15, 2025 Page No. 05
Powered by: erelego.com



# ग्रामगौरव

## नागरिकांसाठी व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे थेट संवादाची सुवर्णसंधी

### जि .प. चे एक अभिनव उपक्रम राबवण्यास सुरुवात

न्यूज डेस्क | जळगाव

**नागरिकांचे जीवनमान अधिक सुकर करण्याच्या दृष्टीने जिल्हा परिषद, जळगावने एक अभिनव उपक्रम राबवण्यास सुरुवात केली आहे. जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती मिनल करनवाल यांच्या मार्गदर्शनाखाली आता नागरिकांना दररोज व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे जिल्हा परिषदेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांशी थेट संवाद साधता येणार आहे.**

संवादासाठी आवश्यक लिंक आणि QR कोड जिल्हा परिषदेच्या https://zpjalgaon.gov.in अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध आहे. नागरिकांनी या सुविधेचा अधिकाधिक लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा परिषद प्रशासनामार्फत करण्यात येत आहे.

या उपक्रमाचा उद्देश नागरिक, ग्रामस्थ यांना त्यांच्या अडचणी, तक्रारी किंवा सूचना थेट प्रशासनापर्यंत पोहोचवण्याची सुविधा उपलब्ध करून देणे हा आहे. यामुळे नागरिकांना जिल्हा परिषद कार्यालयात प्रत्यक्ष येण्याची गरज भासणार नाही, तर ते घरबसल्या संवाद साधू शकतील.

**मुख्य वैशिष्ट्ये:**

- दररोज सकाळी १० ते ११ या वेळेत संवाद साधण्याची सुविधा.
- जिल्हा परिषदेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांशी थेट संपर्काची संधी.
- दर… वरिष्ठ अधिकारी नागरि… तक्रारी थेट ऐकणार अ…
- … ऐकलेल्या तक्रारी त… संबंधित विभागाकडे पा… त्या समस्यांचे निरा… करण्यात येणार …
- प्र… तक्रारींचा आढावा … कार्यकारी अधिकारी … घेणार असून, सम… तडीस नेण्यासाठी सात… पाठपुरावा करण्यात येणार …
- तक्र… त्वरित नोंदणी आणि प्र… निराकरणासाठी यंत्रणा.

Gramgaurav Digital Jalgaon Edition
May 14, 2025 Page No. 2
Powered by: erelego.com

**Key Features:**

- Daily interaction facility available from `10:00` AM to `11:00` AM.
- Opportunity to directly connect with senior officials of the Zilla Parishad.
- Senior officials will personally listen to citizens' grievances every day.
- Received complaints will be immediately forwarded to the concerned departments for resolution.
- The Chief Executive Officer will personally review the received complaints and ensure continuous follow-up.

A system is in place for the prompt registration and effective resolution of complaints.